पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.
काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि.वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्रमांक - ०७२५२-२३२१३४.
ई -मेलः- sp.washim@mahapolice.gov.in.
संकेतस्थळ :- www.washimpolice.gov.in.

क्रमांक:-पोअवा/प्रलि.-आशा/सपोउपनि-पदोन्नती/ 5832 /२०२२, वाशिम दिनांक:- /०५/२०२२ 13 MAY 2022

## आदेश

पोलीस हवालदार यांना सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सन २०२१-२२ च्या निवडसुचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या खालील नमुद पोलीस हवालदार यांना पदोन्नती समीतीने पदोन्नतीकरीता पात्र ठरविले आहे. सदर पोलीस हवालदार यांना वेतन मॅट्रीक्स एस-१०, २९२००-९२३००/- मध्ये पदोन्नती स्विकारल्याच्या तारखेपासून तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेनुसार सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात येत आहे. त्यांनी पदोन्नती स्विकारल्याची तारीख विनाविलंब या कार्यालयास कळवावी.

| अ.क्र | हुददा | ब.नं | पोलीस अंमलदाराचे नाव | नेमणुक | पदोन्नती प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १. | पोहवा | ९२० | गजानन धर्माजी सैबेवार | पोस्टे मंगरुळपिर | जेष्ठतेनुसार |
| २. | पोहवा | ३५८ | कैलास लोमाजी गडदे | पोस्टे अनसिंग | जेष्ठतेनुसार |
| ३. | पोहवा | २५ | मोहन शालीग्राम पाटील | पो.मु वाशिम | जेष्ठतेनुसार |
| ४. | पोहवा | ९७४ | अरविंद चंद्रभान वंजारे | मोपवि | जेष्ठतेनुसार |
| ५. | पोहवा | १०८ | शेषराव श्रावण शेजुळकर | श्वान पथक | जेष्ठतेनुसार |
| ६. | पोहवा | २३ | राजेंद बळीराम बगाले | पोस्टे मालेगाव | जेष्ठतेनुसार |
| ७ | पोहवा | १० | प्रल्हाद शेषराव चव्हाण | पोस्टे मानोरा | जेष्ठतेनुसार |
| ८ | पोहवा | ४५९ | भिमराव शंकर भिसे | नियंत्रण कक्ष | जेष्ठतेनुसार |
| ९ | पोहवा | ४९६ | मारोती निवृत्ती भवाळ | पोस्टे वाशिम शहर | जेष्ठतेनुसार |

वर नमूद केलेल्या तातपुरत्या पदोन्नतीच्या आदेशाधिन असलेल्या पोलीस हवालदार यांचे विरुध्द आता गुन्हा दाखल झाला असेल/निलंबनाची कार्यवाही केली असेल/विभागीय चौकशी प्रलंबीत असेल/सौम्य शिक्षेची अंमलबजावणी अद्याप सुरु झालेली नसेल/न्यायालयीन प्रकरण प्रलंबीत असेल,किंवा ते एखादी शिक्षा भोगत असेल तसेच त्यांनी जाती दावा वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नसल्याचे निदर्शनास आल्यास नमुद पोलीस हवालदार यांना सदरची पदोन्नतीबाबत पुढील योग्यती कार्यवाही करण्यात येईल या अटीवर सदरची तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

सदरचे आदेश सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब,दि.०७/०५/२०२१ मध्ये दिलेल्या सुचनेनुसार व राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचीका क्र.२८३०६/२०१७ मधील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन यापुढे पदोन्नतीच्या कोटयातील असलेली सर्व रिक्त पदे दि.२५/०५/२००४ रोजीच्या सेवाजेष्ठतेच्या स्थितीनुसार केवळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेने भरण्याबाबत निर्देश असल्याने निर्गमित करण्यात येत आहे.

तसेच वर नमुद पोलीस हलवादार यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक एसआव्ही २०१५/प्र.क्र.३०३/का.१२,तारीख १२/०९/२०१६ अन्वये जे पोलीस अंमलदार पदोन्नती नाकारणार आहेत, अशा अंमलदारांना दोन वर्षापर्यंत त्यांना त्यांचे पदोन्नती करीता विचार करण्यात येणार नाही तसेच ज्या अंमलदाराने कायमस्वरुपी पदोन्नती नाकारलेली आहे, त्यांचा पुढील कोणत्याही निवडसचीकरीता विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

ज्या पोलीस हवालदार यांना सदरची पदोन्नती स्विकारावयाची नाही त्यांनी तसा विनंती अर्ज सात दिवसाचे आत प्रभारी अधिकारी यांचे मार्फतीने या कार्यालयास सादर करावा.

वर नमुद पोलीस हलवादार यांचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती झाल्याबद्दल आमचे तर्फे अभिनंदन करण्यात येत आहे. पदोन्नती झालेले नमुद पोलीस अंमलदार हे चांगल्या प्रकारे काम करुन पोलीस दलाचे नांव लौकीक करतील आम्ही अशी आशा बाळगून पुढील कार्यास शुभेच्छा देत आहोत.

( बच्चन सिंह )
पोलीस अधीक्षक,वाशिम.

प्रति,

ठाणेदार पोलीस स्टेशन मंगरुळपिर/अनसिंग//मालेगाव/मानोरा//वाशिम शहर/नियंत्रण कक्ष
रापोनि.पोलीस मुख्यालय/मोटार परिवहन विभाग वाशिम/श्वान पथक.

२/-उपरोक्त आदेशात नमूद पोलीस हवालदार यांची सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नतीवर हजर झाल्याबाबतची नोंद स्टेशन डायरीत घेण्यात यावी व पुर्तता अहवाल न चुकता सादर करावा.

प्रतिलिपी :- अपर पोलीस अधीक्षक/पोलीस उपअधीक्षक (मुख्या)/आस्थापना शाखा-२,३/वेतन लिपीक/
डिपीजी लिपीक.

प्रत सविनय सादर:-

मा.पोलीस उपमहानिरीक्षक,अमरावती परिक्षेत्र,अमरावती.